माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/शा/स्व.मा.प्र/२०१६
पुणे दिनांक ३०/०४/२०१६.

प्रति,

शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे
प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड म.न.पा.पिंपरी पुणे.
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) जि.पुणे.
मुख्याध्यापक पुणे जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा

**विषय-** बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याचा नियम ११. पोट नियम (४) अन्वये शाळांना स्वमान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.
**(जिल्हयातील फक त सर्व माध्यमिक शाळा- इ.५ ते १० / इ.८ ते १० / ५ ते १२ साठी )**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, पुणे जिल्हयातील सर्व खाजगी अनुदानित , विना अनुदानित, अंशत अनुदानित, कायम विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दि.१/४/२०१३ ते दि.३१/३/२०१६ या कालावधीसाठी स्वमान्यता प्रमाणपत्र दिलेले आहे. त्याची मुदत दि.३१/३/२०१६ रोजी संपलेली आहे. बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अन्वये **पुन्हा दि.१/४/२०१६ ते दि.३१/३/२०१९ अखेर स्वमान्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाने सर्व शाळांनी घेणे अनिवार्य आहे.** त्यासाठी आपण आपल्या कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांच्या फाईल्स ( इ.५ ते १० वी / इ.८ वी ते १० वी /८ वी ते १२ वी पर्यंतचे वर्ग सुरु असलेल्या माध्यमिक शाळा) एकत्रित करुन सोबत जोडलेल्या तपासणी फार्ममध्ये स्वमान्यतेबाबत शिफारस करुन या कार्यालयाकडे विनाविलंब सादर कराव्यात.

१) पुणे महानगर पालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांसाठी सहा.प्रशासकीय अधिकारी, शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे यांचे कार्यालयात सदरचे प्रस्ताव सादर करावेत.

२) पिंपरी चिंचवड पालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांसाठी प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ पिंपरी चिंचवड म.न.पा.पिंपरी पुणे यांचे कार्यालयात सदरचे प्रस्ताव सादर करावेत.

३) ग्रामीण भागातील (सर्व १३ तालुके) माध्यमिक शाळांनी गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचेकडे प्रस्ताव सादर करावेत.

उपरोक्त प्रमाणे शाळांनी आपले स्वमान्यता प्रमाणपत्र मिळणेबाबतचे प्रस्ताव विहित प्रपत्रामध्ये भरुन तसेच सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रांच्या प्रती सदर प्रस्तावामध्ये जोडुन सदरचे प्रस्ताव उपरोक्त संबंधित कार्यालयामध्ये तात्काळ जमा करावेत.

स्वमान्यतेच्या फाईल्स सादर करताना R.T.E.Act २००९ नुसार सर्व निकषांची (१० निकष) पुर्तता अहवाल व वर्गनिहाय पटसंख्या अहवाल यावर सहा.प्रशासकीय अधिकारी / प्रशासन अधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांच्याच स्वाक्षरीनेच सादर करावेत. **केंद्रप्रमुख / शिक्षण विस्तार अधिकारी यांचे स्वाक्षरीचा अहवाल मान्य केला जाणार नाही.**

प्रस्तावासोबत R.T.E.Act २००९ निकषाचा फॉर्म, शाळा मान्यता आदेश, प्रथम मान्यता आदेश, नैसर्गीक वर्ग वाढ मंजूरी आदेश, मागील दिलेल्या स्वमान्यता प्रमाणपत्राची प्रत (दि.१४/२०१३ ते दि. ३१/३/२०१६) व पटसंख्याबाबत अहवाल इ.कागदपत्रे सदर प्रस्तावामध्ये असल्याची खात्री करुन घ्यावी व तपासुन तपासणी फॉर्म भरुन कार्यक्षेत्राप्रमाणे सहा.प्रशासकीय अधिकारी / प्रशासन अधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांच्या स्पष्ट शिफारशीसह **सर्व एकत्रित प्रस्ताव या कार्यालयाकडे दि.३१/५/२०१६ पर्यंत सादर करावेत.**

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**